# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र-६५** **दिनांक:- १८/०३/२०२१**

## एकाच क्रमांकाच्या बनावट नंबर प्लेट तयार करुन प्रवासी भाडयाकरीता वापरत असलेल्या रिक्षा चालक आरोपीतास अटक

दिनांक १७/०३/२०२१ रोजी १७.३० वा. सुमारास बाप्पा सिताराम मार्केट, सागर स्वीट जवळ, नालासोपारा पूर्व येथे पोहवा/१२९२ राजु शंकर गायकवाड हे वाहतुक नियमन कर्तव्य बजावत असताना त्यांना एकाच क्रमांकाच्या दोन प्रवासी रिक्षा ( क्रमांक एमएच ४८ ए ७९११) आढळुन आल्याने व त्यांचा संशय बळावल्याने त्यांनी दोन्ही रिक्षा चालकांना थांबवुन तात्काळ पोलीस उपनिरीक्षक, श्री विनोद जाधव यांना घटनास्थळी बोलावून घेवून कागदपत्रांची तपासणी केली असता मुळ प्रवाशी रिक्षा क्रमांक एमएच ४७ डी ५१४६ ऐवजी क्रमांक एमएच ४८ ए ७९११ हा बनावट क्रमांक लावून ती त्याच क्रमांकाची रिक्षा असल्याचे भासवून मागील तीन महिन्यापासून प्रवासी भाडयाकरीता वापरुन स्वत:चा आर्थिक फायदा व्हावा म्हणून शासनाची फसवणूक केली असून रिक्षा चालकाकडे प्रवासी रिक्षा चालवण्याचा कोणताही अधिकृत परवाना मिळुन आलेला नाही.

सदरबाबत पोहवा/१२९२ राजु शंकर गायकवाड यांनी तुळींज पोलीस ठाणे गु र नं ३९९/२०२१ भादवि सं कलम ४२०,३४ मो.वा.का. कलम ५०/१७७, ६६/१९२,२१/१७७ अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीत नामे लक्ष्मण सुखदेव हातकर रा.नालासोपारा पूर्व २) दिनानाथ रमाशंकर यादव रा. नालासोपारा पूर्व यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पूढील तपास पोउपनि/श्री मल्हार थोरात तुळींज पोलीस ठाणे हे करीत आहेत.

Scanned with CamScanner